**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र 09.15 P.M.**

**दिनांकः 22.04.2021** **वारः गुरुवार**

---

***कोरोनाचा प्रादुर्भाव पुन्हा वाढतो आहे. त्यामुळे सर्वांनीच सुरक्षा उपायांचं पालन करावं आणि पात्र नागरिकांनी न घाबरता ,लसीकरण करून घ्यावं, असं आवाहन करत आहोत. सुरक्षित राहा आणि कोरोना संसर्ग रोखण्यासाठी मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ धुवा आणि सुरक्षित अंतर राखा.***

---

**ठळक बातम्या**

हवामान बदलाच्या संकटाविरुध्द जागतिक स्तरावर एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असल्याच पंतप्रधानांचं प्रतिपादन

वाढत्या कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान उद्या उच्चस्तरीय आढावा बैठक घेणार

प्रादुर्भाव जास्त असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी तसंच ऑक्सिजन उत्पादकांशीही पंतप्रधान साधणार संवाद

ऑक्सिजन पुरवठा तसंच कोविड लसीकरण या विषयांवर राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे केंद्राला निर्देश

देशात कोरोना नवबाधितांचा उच्चांक काल 3 लाख 14 हजार नव्या रुग्णांची नोंद

कोरोनाची साखळी तोडण्यासाठी राज्यात नव्या कडक निर्बंधांची अंमलबजावणी सुरू

आणि

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात 79 टक्के मतदान

---

**पंतप्रधान हवामान**

मानवजातीला वाचवण्यासाठी हवामान बदलाच्या संकटाविरुध्द जलद गतीनं जागतिक स्तरावर एकत्रित प्रयत्न करणं ही काळाची हाक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. हवामानविषयक जागतिक शिखर संमेलनात ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बोलत होते. 2030 साठी जगाचे एकत्रित प्रयत्न या विषयावरील चर्चासत्रात पंतप्रधानांनी आपले विचार मांडले.

जगभरातले 40 नेते या परिषदेत सहभागी झाले असून हवामान बदल, त्यातील आव्हाने, उपाय यावर विचारमंथन अपेक्षित आहे.
भारत हा एक विकसनशील देश असून आम्हाला आमची आव्हानं असली. तरीही आम्ही आमच्या परीनं जंगलतोडीला आळा, स्वच्छ ऊर्जा स्त्रोत, ऊर्जा बचत, जैवविविधता जपण्याचे प्रयत्न करत आहोत. 2030 पर्यंत नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांद्वारे 450 गिगावॅट ऊर्जानिर्मिती हे लक्ष्यच आमची वचनबद्धता दाखवून देईल,असं पंतप्रधान म्हणाले. कार्बन उत्सर्जनाचं भारतचं दरडोई प्रमाण जगाच्या सरासरी प्रमाणाच्या 60 टक्के कमी आहे. आणि पर्यावरणपूरक जीवनशैली आमच्या संस्कृतीचं अविभाज्य अंग आहे. निसर्गाकडे परत जाण्याची आज गरज असून आर्थिक विकास साधायचा असला तरी आपल्या जीवनशैलीत बदल घडवून आणण्याची तयारीच आपल्याला वाचवू शकेल, असं पंतप्रधान म्हणाले. शाश्वत विकासाच्या आमच्या मार्गावर आम्हाला वातावरणाचा विचार करणारे सहभागी हवे आहेत त्याच बरोबर इतर देशांना सर्व प्रकारची मदत करण्यासही आम्ही तयार आहोत, अशी ग्वाही त्यांनी दिली. जागे व्हा आणि आपले लक्ष्य गाठेपर्यंत थांबू नका, या स्वामी विवेकानंदांच्या प्रसिद्ध वचनाचा आधार घेत त्यांनी सर्वांना ह्या अभियानात सहभागी होण्याचं आवाहन केलं. ह्या शिखर परिषदेसाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांचे आभार मानले. भारत आणि अमेरिका हे स्वच्छ ऊर्जा स्त्रोत आणि हवामान या क्षेत्रात भागीदारी करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यासाठी गुंतवणूक आणि तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी दोन्ही देश एकमेकांना मदत करतील असं मोदी म्हणाले.

**पंतप्रधान कोविड बैठक**

देशातल्या वाढत्या कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या एक उच्चस्तरीय आढावा बैठक घेणार आहेत. पंतप्रधान उद्या कोरोना संदर्भात तीन महत्त्वपूर्ण बैठका घेणार आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी तसंच ऑक्सिजन उत्पादकांशी ही ते संवाद साधणार आहेत. दरम्यान पंतप्रधानांनी पश्चिम बंगाल मधील आपला उद्याचा नियोजित दौरा रद्द केला आहे.

**ऑक्सिजन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातल्या ऑक्सिजन उपलब्धतेचा आढावा घेतला. विविध राज्यांना ऑक्सिजनचा पुरवठा विना अडथळा आणि सुरळीतपणे करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.ऑक्सिजनचं उत्पादन आणि पुरवठा वाढवण्यासाठी आणखी काय करता येईल यावर विचार करा अशी सूचना मोदी यांनी केली.
या बैठकीसह वैद्यकीय ऑक्सिजनच्या निर्मिती आणि पुरवठ्याबाबत सुरु असलेल्या काही उपाय योजनांवर आधारित हा वृत्तांत

स्क्रिप्ट

ऑक्सिजन पुरवठ्याबाबत राज्यांनी योग्य समन्वय राखणं आवश्यक असून प्राणवायूची साठेबाजी करणाऱ्यांविरुद्ध राज्यांनी कठोर कारवाई करावी असं आवाहन पंतप्रधानांनी या बैठकीत केलं. तत्पूर्वी विविध राज्यांना करण्यात आलेल्या ऑक्सिजन पुरवठ्याची माहिती पंतप्रधानांना देण्यात आली. वीस राज्यांमधून दररोज 6 हजार 785 मेट्रिक टन ऑक्सिजन ची मागणी आहे त्यांना काल 6 हजार 822 मेट्रिक टन ऑक्सिजन दररोज देण्याचा निर्णय घेतल्याचं घेण्यात आला आहे.ऑक्सिजनचा पुरवठा वाढवण्या बरोबरच अत्यंत कमी तापमानात ऑक्सिजनची साठवणूक करू शकणाऱ्या क्रायोजेनिक टँकर्सची संख्या वाढवण्यावरही भर दिला जात आहे. 105 मेट्रिक टन क्षमता असलेली पहिली ऑक्सिजन एक्स्प्रेस विशाखापटणमहून मुंबई कडे आज रात्री प्रयाण केत आहे. तर अन्य ऑक्सिजन एक्स्प्रेस  वाराणसीमार्गे लखनऊ बोकारोला पोहोचत आहे.  ही वेळ वाचवण्यासाठी  रिकामे ऑक्सिजन टँकर्स वितरकांना हवाई मार्गा नं देखील पाठवले जात आहेत.दरम्यान ऑक्सिजन ची वाहतूक करणाऱ्या वाहनांना आंतर राज्य वाहतुकीसाठी कुठलाही अडथळा येणार नाही याची काळजी घ्या असे निर्देश केंद्रा नं विविध राज्यांना दिले आहेत. केंद्रीय गृह सचिव अजयकुमार भल्ला यांनी या संदर्भात राज्यांना पत्र लिहिलं आहे. ऑक्सिजन ची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कुठलीही कारवाई करू नका ती जप्त करू नका असंही या पत्रात म्हटलं आहे.तत्पर्वी आज केंद्र सरकारनं ऑक्सिजनच्या औद्योगिक वापरावर पुढील आदेशांपर्यंत बंदी घातली आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी विजयालक्ष्मी साळवी पुणे

## नासा

एकीकडे भारतासह अन्य अनेक देशांत प्राणवायूमुळे प्राण कंठाशी आलेले असताना अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासा ला मंगळ ग्रहावर ऑक्सिजन तयार करण्यात यश आलं आहे. नासा च्या परसीवरंस या मंगळ यानानं मंगळावरच्या कार्बन डाइ ऑक्साइड पासून ऑक्सीजन बनवला आहे. ही प्रक्रिया मंगळ यानाच्या मॉक्सी या छोट्या विभागात करण्यात आली.  नासा नं मंगळावर बनवलेला 5 ग्रॅम ऑक्सीजन एखाद्या व्यक्तीला मंगळावर 10 मिनिटे श्वास घ्यायला पुरेल.

## सर्वोच्च न्यायालय

वैद्यकीय वापर्साठीचा ऑक्सिजन आणि आवश्यक औषधांचा पुरवठा तसंच कोविड लसीकरण या विषयांवर राष्ट्रीय धोरण तयार करण्याचे निर्देश  सर्वोच्च न्यायालयाने आज केंद्राला दिले. देशातील कोरोनाच्या गंभीर परिस्थितीची स्वत:हून दखल घेत सर न्यायाधीश न्यायमूर्ती शरद बोबडे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने आज हे निर्देश दिले. कोविड साथी दरम्यान टाळेबंदी लावण्याबाबत उच्च न्यायालयांना न्यायालयीन अधिकार आहे का याची  तपासणी केली जाईल असं या पीठा नं म्हटलं आहे.

दिल्ली, मुंबई, सिक्कीम, मध्य प्रदेश, कलकत्ता आणि अलाहाबाद उच्च न्यायालय कोविडशी संबंधित याचिकांवर विचार करीत आहेत, उच्च न्यायालय सर्वांच्या हिताच्या दृष्टीनं आपल्या अधिकारांचा योग्य वापर करून काम करत आहेत मात्र यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे केंद्राने कोविड संबंधी राष्ट्रीय धोरण जाहीर करावं असं सर्वोच्च न्यायालया नं म्हटलं आहे.

## देश कोविड

आज सकाळी संपलेल्या चोवीस तासांत देशात कोरोना नवबाधितांची उच्चांकी संख्या नोंदवली गेली. 3 लाख 14 हजार नव्या रुग्णांची नोंद झाल्याचं आरोग्य मंत्रालयानं कळवलं आहे. यासह देशातील एकंदर कोरोना बाधितांची संख्या एक कोटी 59 लाखांच्या पुढे गेली आहे. देशात सध्या 22 लाख 91 हजार रुग्णांवर उपचार सुरू आहे. कोविड मुळे एकाच दिवसात होणाऱ्या मृत्यूंची संख्याही उच्चांकी असून काल दिवसभरात 2 हजार 104 जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे देशात कोविड मुळे झालेल्या एकंदर मृत्युंची संख्या 1 लाख 84 हजार झाली आहे.

देशात आता पर्यंत लसीच्या 13 कोटी 23 लाख 30 हजार 644 मात्रा देण्यात आल्या आहेत.

**कोविन नोंदणी**

कोविड 19 लसीकरणाचा तिसरा टप्पा 1 मेपासून सुरू होत असून 18 वर्षांवरील सर्वजण लस घेण्यासाठी पात्र आहेत. त्यांना येत्या 28 तारखेपासून कोविन ॲपवर नोंदणी करता येईल. लसीकरणाच्या ह्या टप्प्यात लस उत्पादक 50 टक्के लस केंद्र सरकारला देणार असून उर्वरित 50 टक्के साठा राज्य सरकारं आणि खुल्या बाजारात विकू शकेल. आरोग्य आणि आघाडीचे कर्मचारी तसंच 45 वर्षांवरील व्यक्तींना केंद्र सरकार पूर्वीप्रमाणेच मोफत लस देणार आहे.

**राज्य निर्बंध**

कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्यात आणखी निर्बंध लागू करण्यात आले आहेत. आज रात्री 8 वाजल्यापासून या निर्बंधांची अंमलबजावणी सुरू झाली. त्यानुसार अत्यावश्यक सेवेतल्या आणि सरकारी ओळखपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांनाच केवळ उपनगरी रेल्वेतून प्रवासाला मुभा आहे. सार्वजनिक आणि खाजगी बस मधून एकूण क्षमतेच्या केवळ 50 टक्के प्रवाशांना प्रवासाची मुभा आहे तर विवाह समारंभांना केवळ 25 जणांनाच परवानगी आहे. राज्य आणि केंद्र सरकारी कार्यालयात केवळ 15 टक्के उपस्थितीची परवानगी असून आंतरजिल्हा वाहतुकीवरही बंदी घालण्यात आली आहे. केवळ परवानगीनेच हा प्रवास करता येईल. अन्य जिल्ह्यात प्रवास केल्यावर 14 दिवसांची विलगीकरणाची सक्ती करण्यात आली आहे. अत्यावश्यक वस्तू, मटण-अंडी, भाजीपाला आदी दुकानांना केवळ सकाळी सात ते अकरा पर्यंत दुकान सुरू ठेवायला मुभा दिली आहे.

**उदय सामंत**

कोरोनाचा वाढता संसर्ग आणि कठोर निर्बंधांमुळं महाराष्ट्रातील सर्व 13 अकृषी विद्यापीठातील परीक्षा ऑनलाईन पद्धतीनं घेतल्या जाणार असल्याची घोषणा राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज केली आहे. विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सामंत यांनी ही माहिती दिली.आगामी शैक्षणिक वर्षाच्या नियोजनासाठी 15 दिवसात पुन्हा कुलगुरूंसोबत बैठकी घेतली जाईल असंही सामंत यांनी सांगितलं. विद्यार्थ्यांचं लसीकरण विद्यापीठामार्फतच करण्याचा विभागाचा मानस आहे. त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाशी चर्चा करण्यात येणार असल्याचं सामंत यांनी स्पष्ट केलं.

अमरनाथ

जम्मू काश्मीरमध्ये कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अमरनाथ यात्रेची नोंदणी तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. आम्ही परिस्थितीवर काळजीपूर्वक लक्ष ठेवून आहोत, आणि परिस्थिती

सुधारली तर नोंदणी पुन्हा सुरू केली जाईल, असं सांगण्यात आल्याचं आमच्या जम्मूच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**झारखंड**

झारखंडमध्ये 'ब्रेक द चेन' मोहिमेअंतर्गत आज पासून 29 तारखेपर्यंत आरोग्य सप्ताहाचं पालन केलं जाणार आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांना घरी राहण्याचं आवाहन केलं जात आहे. अत्यावश्यक आणि आरोग्य सेवा सुरू असल्या तरी लोकांना कारणाशिवाय बाहेर पडण्यास परवानगी नाही. सर्व बँका केवळ सकाळी 10 ते दुपारी 2 असे चारच तास सुरू राहणार आहेत. कोविड रुग्णांसाठी सरकारनं दोन हजार 124 खाटांची सोय केली असून रांचीमध्ये ऑक्सिजनसह 300 खाटांचा विभाग सुरू करण्यात आला आहे.

**ममता**

कोविड 19 वरील लसीची देशभरात एकच किंमत ठेवण्याची मागणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहे. केंद्र सरकार ह्या लसीची प्रत्येक राज्यात वेगळी किंमत असण्याला परवानगी देत असल्याबद्दल तपन इथं एका सभेत बोलताना त्यांनी सरकारवर टीका केली. प्रत्येक पात्र नागरिकाला धर्म, वय, लिंग, राहण्याचे ठिकाण याचा फरक न करता मोफत लस मिळायला हवी, अशी मागणी त्यांनी केली आहे. केंद्र किंवा राज्य कोणीही लस खरेदी करत असेल, तरी त्यांना एकाच किंमतीला लस मिळायला हवी, अशी मागणी त्यांनी ट्विटरवरही केली आहे.

**पश्चिम बंगाल मतदान**

पश्चिम बंगाल मध्ये आज विधानसभेच्या सहाव्या टप्प्यात 79 टक्के  मतदानाची नोंद झाली. राज्यातील 43 विधानसभा मतदारसंघात आज मतदान झाल. आता विधान सभा निवडणुकीचा सातवा आणि आठवा टप्पा शिल्लक आहे. त्यासाठीचा  प्रचार  सध्या सुरु आहे. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगानं प्रचारावर विविध निर्बंध आणले आहेत.

**ओदिशा निवडणूक**

ओदिशातल्या पिपली मतदारसंघातली विधानसभेची पोटनिवडणूक आता 16 मे रोजी होणार आहे.13 मे रोजी होणारी ही निवडणूक ईदचा सण असण्याची शक्यता लक्षात घेउन पुढे ढकलण्यात आली आहे.19 तारखेला मतमोजणी होईल, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी सुशिल कुमार लोहानी यांनी आज भुवनेश्वरमध्ये दिली.कॉंग्रेस उमेदवाराचा मृत्यू झाल्यामुळे एकदा ही निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे.

**इंडोनेशिया पाणबुडी**

इंडोनेशियाच्या नौदलाची बेपत्ता पाणबुडी नान्गला हिचा शोध घेण्यासाठी भारतीय नौदलानं आपलं अत्याधुनिक पाण्याखालील बचाव कार्य करू शकेल असं जहाज मदतीला पाठवलं आहे. बाली पासून 25 मैलांवर सराव करणारी ही पाणबुडी काल बेपत्ता झाली. बोटीवर 53 कर्मचारी आहेत. आंतरराष्ट्रीय पाणबुडी बचाव कार्यालयांनं ह्या पाणबुडीला मदत करण्यासाठी हाक दिली होती. खोल समुद्रात पाण्याखालील मदत कार्य करू शकणाऱ्या मोजक्या देशांमध्ये भारताचा समावेश आहे.भारत आणि इंडोनेशियाच्या नौदलांमध्ये मैत्रीपूर्ण संबध आहेत. त्या संबंधांचा विचार करून आणि आपल्या संस्कृतीला जागून भारतानं ही मदत देऊ केली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**